दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक १७० | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.९ सप्टेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

### मच्छिमार कृती समिती आक्रमक

## लालबागचा राजा मंडळाविरोधात थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

लालबागचा राजा सार्वजनिक गणेश मंडळ विरोधात तक्रार करण्यात आली आहे. मच्छिमार कृती समितीकडून ही तक्रार करण्यात आली आहे.

विसर्जन प्रक्रियेवेळी झालेल्या गोंधळामुळे लालबागच्या राजाचं विसर्जन चंद्रग्रहणाच्या काळात झालं. यामुळे लाखो गणेश भक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, असा आरोप मच्छिमार कृती समितीने केला आहे. तसेच लालबागला दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचा मानसिक आणि शारीरिक छळ होत असल्याचा देखील आरोप समितीने केला आहे. अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी ई-मेलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. त्यांनी या पत्रात लालबागच्या मंडळाच्या कार्यकारी मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

# उरण ओएनजीसी प्रकल्पात भीषण स्फोट

### परिसरातील घरांना मोठ- मोठे हादरे, अनेकांच्या घरांचे अतोनात नुकसान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील ओएनजीसी प्रकल्पाच्या गॅस प्रोसेसिंग विभागात काल ८ सप्टेंबर रोजी दुपारी ३:०० वाजताचे सुमारास भीषण स्फ़ोट झाला. या भीषण स्फ़ोटानंतर तेथे आगीचे लोड तांडव पसरले. या परिसरातील नागाव गावासह आजूबाजूच्या मानवी वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हादरे बसले. हादरे एवढे भयानक होते की, परिसरातील घरांच्या खिडक्यांसह घरांचे मोठे नुकसान झाले आहे. येथील गॅस पाईपलाईन गरम झाल्याने ही दुर्घटना झाल्याचा प्रार्थमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

स्फोटातील प्रचंड आवाजामुळे दोन ते किमी परिसर दणाणून गेला. परिसरावर मोठ्ठी आपत्ती आली की काय ? अशी भिती नागरिकांना वाटू लागली होती. स्फोटाच्या आगीतील काळा धुर व प्रचंड ज्वालामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी ओएनजीसी प्रकल्पतील अग्निशमन पथक व संकट व्यवस्थापन पथक तात्काळ घटना स्थळी दाखल झाल्याने अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणण्यात यश आले. तर या दुर्घनेत सुदैवाने कोणत्याही जीवित हानी झाली नाही.



मात्र नागरिकांच्या घरांना मोठे हादरे बसले आहेत. आग आटोक्यात आल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रकल्पतीला अधिकाऱ्यांनी सांगितले. तर आग आणखी भडकण्याची शक्यता लक्षात घेऊन, खबरदारीचा उपाय म्हणून प्रकल्पाच्या आजूबाजूचा परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. सुरक्षेच्या दृष्टीने गॅस पुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला असून, परिस्थिती स्थिर राखण्यासाठी कंपनी प्रशासनाचे प्रयत्न सुरु आहेत. परिसरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन ओएनजीसी अधिकाऱ्यांनी केले आहे. सायंकाळ पर्यंत येथील आग विझाविण्याचे काम सुरु होते. अशी माहिती उरणचे तहसिलदार डॉ.उद्धव कदम यांनी दिली.

■ मात्र प्रकल्पात वारंवार घडणाऱ्या गॅस गळती, स्फोट आणि आगीच्या होणाऱ्या घटणांमुळे उरण शहरासह नागाव, म्हातवली आणि परिसरातील जीवितास धोका निर्माण झाला आहे. या दुर्घटनेबाबत योग्यतेने सखोल व पारदर्शक चौकशी होऊन, नेमका स्फोट कशामुळे झाला. प्रशासनाच्या हलगर्जीपणा आहे का ? सुरक्षा यंत्रणेत अधिक सुधारणा व्हावी, आपत्कालीन उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी उरणवासियांनी केली आहे.

■ या प्रकल्पात या आधी लागलेल्या आगीत काही कामगार व नागरिक मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तर सदर दुर्घटनेत अग्निशमन पथकाने केलेल्या अथक प्रयत्नांने आग आटोक्यात आल्याने मोठा अनर्थ टळला आहे.


### महात्मा ज्योतीबा हातगाडी संघटना गौरा गणेश उत्सवाचे ३३ वे वर्ष

# पनवेलकरांना घडणार लालबागच्या राजाचे दर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भक्तांचे दुःख हरण करणाऱ्या व ज्याच्या दर्शनासाठी लाखो भक्तांचा सागर मुंबईत लोटतो त्या लालबागच्या राजाचे दर्शन पनवेलकरांना होणार आहे. पनवेलमधील महात्मा ज्योतीबा फुले हातगाडी संघटना श्रीगौरा गणेश उस्तवा निमित्त लालबागच्या राजाची प्रतिकृती पनवेलमध्ये १० सप्टेंबर २०२५ ला विराजमान होणार आहे.

संघटनेचे गौरा गणेश उत्सवाचे ३३ वे वर्ष असुन सामाजिक बांधिलकी जोपासुन श्रीगौरा गणेश उस्तव मोठया भक्तीमय वातावरणात लाखोंच्या उपस्थितीत शांततामय साजरा केला जात असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस. के. नाईक यांनी सांगीतले आहे. पनवेल मधिल महात्मा ज्योतीबा फुले हातगाडी संघटना व फळभाजी विक्रेते सहकारी संस्था यांच्या सयुक्त विद्यामाने गेल्या ३२ वर्षापासुन गौरा गणेश उस्तव साजरा केला जात आहे.



या संघटनेचे जवळपास तीन हजारापेक्षा जास्त सभासद असुन यामध्ये छोटे मोठे व्यवसाय करुन आपले उदरनिर्वाह करणारयांचा सहभाग मोठया संख्येन आहे. गौरा गणेश उस्तव साजरा करण्यामागची संकल्पना सांगताना महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस. के. नाईक यांनी सांगितले की पनवेल तालुक्यात गणेश उस्तव साजरा होत असताना गणेश भक्ताना गणरायासाठी आवश्यक असणारे साहीत्य विक्री करण्यात येथील छोटे व्यवसायीक गुतलेले असतात त्यावेळी गणेश उस्तवाचा आनंद घेता येत नाही सर्वच संघटनेचे सभासद गणेश उस्तव मोठया उस्ताहाने साजरा करु शकत नाहीत यासाठीच संघटनेने ३२ वर्षापुर्वी गौरा गणेश उत्सव साजरा करण्याची सुरवात केली.

दिड दिवसांनंतर मोठया दिमाखात शाही थाटात राजाचे विर्सजन ११ सप्टेंबर २०२५ ला मोठया भावपुर्ण वातावरणात होणार असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या गौरा गणेश उत्सवाचे अध्यक्ष प्रल्हाद नाईक यांनी सांगितले.

१० सप्टेंबर २०२५ ला सकाळी ७ वाजता डॉ. सौ कल्याणी विशाल वसंत पाटील यांचा हस्ते श्रीगौरा गणेशपूजन असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस. के. नाईक यांनी सांगितले. उत्सवाच्या प्रारंभी वेगवेगळया मुर्तिची प्रतिष्ठापणा केली जात होती. परतू गेल्या २६ वर्षापासुन लालबागच्या राज्याची प्रतिकृती पनवेल मध्येच तयार करुन स्थापना केली जात आहे.

लालबागच्या राजाची मूर्ति साकारणारे संतोष रत्नाकर कांबळी व त्यांचे ईतर सहकारी पनवेल मध्ये गणेश मूर्ति साकारण्यासाठी रात्रंदिवस काम करीत आहेत तसेच राजाचे धोतर सजवण्याचे काम रुपेश पवार करीत आहेत. गौरा गणेश उत्सव साजरा करीत असताना सर्व धर्मिय जात पात वंश भेद विसरुन एक दिलाने काम करीत असतात. याप्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते या महाप्रसादाचा लाभ जवळपास साठ हजारापेक्षा जास्त गणेश भक्त घेत असतात.

## उलव्यात पहिल्यांदाच अभिनयाचे बादशहा अशोक सराफ यांची एंट्री होणार

**दै.रायगड नगरी । उलवे**

मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज, 'पद्मश्री' पुरस्कारप्राप्त अभिनेते अशोक सराफ आणि निवेदिता जोशी-सराफ यांची रविवारी (ता.७) आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी भेट घेतली. सोबत रंगभूमी व चित्रपटसृष्टीशी निगडित अनेक वर्षे लीलया वावरणारे नरेंद्र बेडेकर होते.

यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी अशोक सराफ-निवेदिता जोशी-सराफ यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मनसोक्त गप्पा मारल्या. त्यांच्यातील साधेपणा पाहून महेंद्रशेठ यांना मनस्वी आनंद झाला. यावेळी त्यांनी 'कैलास मानसरोवर' यात्रेवरून आणलेले जल अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांना दिले. त्यांनीही ते आनंदाने प्राशन केले. यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी शाल, पुष्पगुच्छ आणि 'सुखकर्ता', 'परदेश प्रवासाची पंचविशी' आणि 'जय शिवराय' ही पुस्तके त्यांना भेट देऊन आनंद व्यक्त केला; तर अशोक सराफ यांनी त्यांच्या जीवनावरील 'बहुरुपी' हे पुस्तक आपल्या स्वाक्षरीने महेंद्रशेठ घरत यांना भेट म्हणून दिले. यावेळी अशोक सराफ यांच्याशी संवाद साधताना महेंद्रशेठ घरत म्हणाले, मी आपल्या अभिनयाचा चाहता आहे. आपल्या अनेक चित्रपटांमुळे मी मनमुराद हसलो आहे. आमच्या आख्ख्या पिढीने आपल्या चित्रपटांचा आस्वाद घेतला आहे. आपल्याला चित्रपटसृष्टीतील उत्तम कारकिर्दीबद्दल आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले आहेत. 'पद्मश्री' पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. याचा मला अतिशय आनंद आहे. आईच्या नावाने 'यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थे'मार्फत आम्ही अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित आहोत. अनेक दीनदुबळ्यांना



आधार देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण फुलविण्याचा प्रयत्न करतोय. त्यामुळे रायगड, नवी मुंबईच्या सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने आमच्या संस्थेमार्फत आपला नागरी सन्मान करण्याची इच्छा आहे.

त्यावेळी हसतहसतच अशोक सराफ आणि निवेदिता सराफ या अभिनयावर अधिराज्य गाजवणाऱ्या दाम्पत्याने नागरी सन्मान स्वीकारण्याची संमती दिली. त्यामुळे उलव्यात पहिल्यांदाच 'पद्मश्री' पुरस्कारप्राप्त अभिनेते अशोक सराफ यांचे आगमन होणार आहे. त्यांचा २८ सप्टेंबरला 'यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थे'मार्फत 'भूमिपुत्र भवन' येथे भव्यदिव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे लोकायुक्त अभियान : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । रायगड**


ग्रामविकास मंत्रालयाकडून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे लोकायुक्त अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येणार आहे. गावांचा विकास होण्याच्या दृष्टीने हे एक सकारात्मक पाऊल आहे. या अभियानात सर्व ग्रामस्थांनी मिळून एकत्रित काम केल्यास गावांचा विकास शक्य असल्याचे मत महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी केले. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळा कुरुळ येथील आरसीएफ सभागृहात पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी रोहयो मंत्री भरत गोगावले, यशद-ाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधी-क्षक आचल दलाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहीतुले, माध्यमिक शिक्षण अधिकारी महारुद्र नाळे, आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांच्यासह जिल्हा परिषद खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच उपस्थित होते.



यावेळी कु.तटकरे म्हणाल्या की, ग्रामपंचायत म्हणजे राज्य व केंद्र सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचे सर्वोत्तम साधन आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सात घटकांवर आधारित आहे. सर्व ग्रामस्थांनी मिळून एकत्रित काम केल्यास गावांचा विकास शक्य आहे. गाव अधिकाधिक स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत तसेच जलसमृद्ध गाव करणे हा प्रमुख दृष्टिकोन असावा, असे आवाहनही मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

गावांचा शाश्वत व सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत योजना जनतेच्या दारी पोहोचतील. गाव सक्षम असेल तर जिल्हा सक्षम होईल, जिल्हा सक्षम झाला तर राज्य आणि राज्य सक्षम झाले ते देश सक्षम होईल. सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा, हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वो तोपरी सहकार्य करू, असे आश्वासन रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी केले.

# महाराष्ट्र पुन्हा ‘नापास’

देशातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांची राष्ट्रीय क्रमवारी (एनआयआरएफ) सालाबादप्रमाणे जाहीर झाली असून, त्यातील महाराष्ट्राच्या कामगिरीत गेल्या वर्षीच्या तु-लनेत ठळक सुधारणा नाही. सर्वसाधारण गटात राज्यातील यंदाच्या संस्थांची संख्या गेल्या वर्षीइतकीच म्हणजे अकरा आहे; अन्य वर्गवारीतील फरकही किरकोळ आहे. लक्षणीय बाब एकच; ती म्हणजे कधी काळी शिक्षणासाठी देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राची या क्षेत्रात सातत्याने पीछेहाट होत असून, तमिळनाडूसारखे राज्य वेगाने पुढे जात आहे. ‘एआयआरएफ’ क्रमवारीत तर महाराष्ट्र आणि तमिळनाडू यांच्यात तुलनाच होऊ शकत नाही, अशी स्थिती आहे. राष्ट्रीय क्रमवारीतील पुन्हा पुन्हा ‘नापास’ होत असूनही याकडे ‘ना खंत, ना खेद’ या दृष्टिकोनातून पाहिले जाण्याची शक्यता दिसते. मात्र, महाराष्ट्र शिक्षणात ‘लघु’ कामगिरी का करीत आहे, याचा विचार करायला हवा. तमिळनाडूत कोणती धोरणे अवलंबली जात आहेत, याचा अभ्यासही आवश्यक आहे. विद्यापीठे, संशोधन संस्था, महाविद्यालये, व्यवस्थापनशास्त्र संस्था, अभियांत्रिकी-वैद्यकीय आदी विविध व्यावसायिक महाविद्यालये, मुक्त विद्यापीठ , कृषी संस्था, नवता यांसह सर्वसाधारण अशा विविध वर्गवारीतून संस्थांची क्रमवारी जारी करण्याचा केंद्र सरकारचा हा उपक्रम आता रुळला आहे. अध्यापनाची संसाधने, संशोधन, स्नातकांची गुणवत्ता, बहि:शाल शिक्षण, सर्वसमावेशकता आणि समाजातील प्रतिमा या निकषांवर मूल्यांकन करून क्रमवारी ठरविले जाते. यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची झालेली घसरण चिंताजनक आहे. २०२१मध्ये विसाव्या स्थानी असलेले हे विद्यापीठ यंदा ९१व्या स्थानी पोहोचले आहे. अध्यापन हा शिक्षणाचा कणा. कितीही आधुनिक साधने आली, तरी ती पूरक ठरतात; प्रत्यक्ष शिक्षकांद्वारे होणारे अध्यापन परिणामकारक असते. त्यामुळे दर्जेदार शिक्षक गुणवत्ता उंचावण्यासाठी आवश्यक असतात. याच बाबीत महाराष्ट्रातील स्थिती फारशी चांगली नाही. राज्यातील बहुतेक विद्यापीठांत प्राध्यापकांच्या निम्म्याहून अधिक जागा रिक्त आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अडीचशेहून अधिक जागा रिकाम्या आहेत. साठ टक्के प्राध्यापक नसतील, तर मुले शिकणार काय? हंगामी शिक्षक पूर्णवेळ शिक्षकांची कमरता दूर करू शकत नाहीत. प्राध्यापकांच्या जागा भरण्याच्या घोषणा अनेकदा झाल्या; परंतु त्या प्रत्यक्षात आल्या नाहीत. नव्याने प्राध्यापक भरतानाही गटातटाचे राजकारण केले, गुणवत्तेकडे डोळेझाक केली, तर त्याचा विपरीत परिणाम होणार यात शंका नाही; कारण अध्यापनाच्या जोडीनेच संशोधनाचा आणि स्नातकांच्या गुणवत्तेचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. सर्वसाधारण महाविद्यालयांच्या राष्ट्रीय क्रमवारीत महाराष्ट्रातील फक्त तीन महाविद्यालयांचा समावेश असणे, ही बाब धक्कादायक खरी; परंतु आपली महाविद्यालये किती सुमार आहेत हे यातून स्पष्ट होते. अभियांत्रिकी, वैद्यकीय, विधी या सर्व महाविद्यालयांबाबतही महाराष्ट्राची कामगिरी समाधानकारक नाही. राज्यातील ज्या महाविद्यालयांना क्रमवारीत स्थान आहे, ती प्रामुख्याने मुंबई आणि पुणे येथीलच आहेत. क्वचित एखादे महाविद्यालय वा संस्था नागपूर, वर्धा, अमरावती येथील आहेत. बाकी कोणत्या शहरांतील संस्थांना स्थान नाही. महाराष्ट्रातील दर्जेदार शिक्षण केवळ मुंबई-पुण्यात मर्यादित असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ‘आयआयटी’, ‘आयआयएस्सी’, ‘आयसर’, ‘आयआयएम’, ‘एम्स’ यांसारख्या केंद्रीय वलयांकित संस्थांची कामगिरी या क्रमवारीतून पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे. सरकारकडून भक्कम निधी मिळाला, संलग्न महाविद्यालयांचे ओझे कमी केले, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण आदर्श ठेवले, सरकारी हस्तक्षेप थांबविला आणि संशोधनाला वाव दिला, तर गुणवत्ता उंचावते ही गोष्ट या संस्था दर वर्षी सिद्ध करीत असतात. गेल्या काही वर्षांपासून या क्रमवारीत खासगी संस्था वेगाने पुढे येत आहेत आणि विशेषत: राज्य सरकारी महाविद्यालये आणि विद्यापीठे मागे सरकत आहेत. या दोहोंत परस्परसंबंध नाहीच असे नाही. राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे सरकारी संस्थांतील प्राध्यापकांचा खासगी संस्थांकडील कल वाढत आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न व्हायला हवेत. ‘एनआयआरएफ’च्या ताज्या क्रमवारीने ही जाणीव पुन्हा एकदा करून दिली आहे. शिक्षणाबाबतची उदासीनता झटकून राज्य सरकारने आता तरी जागे व्हायला हवे.

## पोलादपूर ख.वि. संघाची निवडणूक बिनविरोध

# अध्यक्षपदी उबाठाचे ज्ञानोबा मालुसरे तर शेकापक्षाचे मनोहर पार्टे उपाध्यक्ष

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

राज्याचे आणि जिल्ह्याचे राजकारण खडाजंगी होत असेल तर पोलादपूर तालुक्यातील राजकीय चित्र सौहार्दपूर्ण खेळीमेळीचे असते याचा प्रत्यय पोलादपूर तालुका खरेदी विक्री सहकारी संघाच्या निवडणुकीप्रसंगी दिसून आला. या निवडणुकीमध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख अनिल मालुसरे यांचे वडील ज्ञानोबा मालुसरे यांची संघाच्या अध्यक्षपदी तर शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मनोहर पार्टे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.



पोलादपूर तालुका खरेदी विक्री सहकारी संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर होताच पोलादपूर तालुक्यातील सर्वपक्षिय प्रमुख पदाधिकारी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यालयामध्ये विचारविनिमयासाठी एकत्र जमले. यामध्ये शिवसेना शिंदे पक्ष, शिवसेना उबाठा पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शप पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अप पक्ष तसेच भाजप व शेतकरी कामगार पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते दिसून आले.

यावेळी खरेदी विक्री संघाचे सदस्य मतदारांची मृत सदस्यसंख्या सर्वाधिक असल्याने उमेदवारी कोणाला द्यायची आणि पाठिंबा कोणी कोणाला द्यायचा, याप्रश्नावर चर्चा होऊन शेवटी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी या निवडणुकीपासून दूर राहिले. यावेळी शिवसेना उबाठा, शेकापक्ष आणि भाजप तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी यांनी ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सामंजस्याची भूमिका दर्शविली. यावेळी अध्यक्षपदासाठी ज्ञानोबा मालुसरे आणि उपाध्यक्षपदासाठी शेकापक्षाचे मनोहर पार्टे यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. कार्यकारिणी सदस्यांचे अर्ज भरून बिनविरोध निवडणूक करण्याचा निर्णयदेखील सर्वपक्षियांमध्ये झाला.

यावेळी राजिमस बँकेचे संचालक एकनाथ गायकवाड, माजी सभापती दिलीप भागवत, माजी सभापती शैलेश सलागरे, अजय सलागरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विठोबा पार्टे, महेश दरेकर, संघाचे माजी अध्यक्ष बाबूराव महाडीक, भाजपचे तालुकाअध्यक्ष वैभव चांदे, काटेतळीचे मोरे, सडवलीचे बापू जाधव, अशोक मोरे, बोरजचे सरपंच मालुसरे, सुवर्णा भुवड व अजित कंक तसेच अन्य पदाधिकारी यांनी अधिकृतपणे उपस्थित राहून पोलादपूर तालुका खरेदी विक्री सहकारी संघाच्या निवडणूक बिनविरोध पार पाडण्यात महत्वाची भूमिका बजावली. यावेळी खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक विजय ग.पवार यांनी कामकाजात सहभाग घेतला.

# पोलिसांनी तत्परतेने खड्डे भरल्याने वाहतूक झाली सुरळीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये पनवेल जवळील पळस्पे परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. याला उपाय म्हणून पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने कर्तव्यावर असताना त्या परिसरातील रस्त्याला पडलेले खड्डे बुजवून घेतल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे.

सध्याच्या सणासुदीच्या दिवसांमुळे पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलिसांची विविध पथके हे पळस्पे फाटा राहूल हॉटेल परिसर त्याचप्रमाणे मुंबई-पुणे महामार्गावर कर्तव्य बजाविण्यासाठी कार्यरत आहेत.

यावेळी त्यांना रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे लक्षात आले. या संदर्भात त्यांनी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः रस्त्यावर उतरुन हे खड्डे बुजवून घेण्यास सुरूवात केली. त्याचा फायदा येथून ये-जा करणाऱ्यांना वाहन मालकांना झाला व मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी ही आता सुरळीत होताना दिसत आहे. याबद्दल चाकरमान्यांनी पनवेल शहर पोलिसांचे आभार मानले आहेत.



# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने माझे झाड उपक्रमाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने साक्षरता दिनाच्या औचित्याने वृक्ष संवर्धन साक्षरता दिनाचे आयोजन करण्यात आले होते. इंडियन ऑइल, पन-वेल तालुका पत्रकार विकास मंच आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमान पार पडलेल्या या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते माझे झाड या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांचे प्रमुख उपस्थिती होती.

वृक्ष पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. मान्यवरांचे स्वागत सत्कार झाल्यानंतर पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या नियोजनाची संकल्पना उपस्थितांसमोर मांडली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी अत्यंत स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दल आयोजकांची प्रशंसा केली. वृक्ष संवर्धन ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी मनोगतातून मांडले. आज सुरू केलेल्या अभियानाच्या अनुषंगाने पुढील १० वर्षानंतर रुजलेल्या आणि वाढलेल्या झाडांच्या सानिध्यात आपण सगळ्यांनी पुन्हा एकदा भेटूयात अशी अपेक्षा व्यक्त केली.पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आमदार विक्रांत पाटील यांनी वृक्ष संवर्धनाचे



महात्म्य कथन केले तसेच पनवेल तालुका पत्रकार विकास मंच पनवेल महानगरपालिका आणि इंडियन ऑइल यांच्या संयुक्त विद्यमाने केल्या जाणाऱ्या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिका हद्दीत १०० बहुवार्षिक वृक्ष लावून त्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिकेचे उद्यान विभाग यांच्या समन्वयाने सदर वृक्षांचे संवर्धन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉक्टर वैभव विधाते, भारतीय जनता पार्टीचे उत्तर जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी,इंडियन ऑइलचे पश्चिम विभाग एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर पी. त्रिपाठी, इंडियन ऑइल एव्हिएशन विभागाचे जनरल मॅनेजर रत्नशेकर भट्टाचारजी, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ ३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले,पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक एड. मनोज भुजबळ, इंडियन ऑइल चे पश्चिम विभाग कॉर्पोरेट कम्युनिकेशन जनरल मॅनेजर अभिषेक कुमार, पश्चिम विभाग कॉर्पोरेट कम्युनिकेशन अधिकारी अनिल नागवेकर,नगरसेवक मनोहर म्हात्रे, प म पा उद्यान विभागाचे वतीने सिद्धार्थ कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, सल्लागार विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, सरचिटणीस हरेश साठे, प्रविण मोहोकर, नितीन कोळी,राजू गाडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# उरण तालुक्यातील मखर स्पर्धेत सुमित पाटील, प्रणाली म्हात्रे व करण पाटील विजयाचे मानकरी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कलाकारांच्या कलेला वाव देण्यासाठी बोरखार येथील सामाजिक युवा कार्यकर्ते तेजस डाकी यांनी आपल्या सामाजिक विकास मंडळातर्फे भव्य मखर सजावट स्पर्धे चे आयोजन केले होते. स्पर्धेत १०० हुन अधिक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता.परिक्षकांनी केलेल्या परिक्षाणानंतर या स्पर्धेचा निकाल ७ सप्टेंबर रोजी बोरखार येथे जाहीर करण्यात आला. यात सुमित पाटील हे प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे मानकरी ठरले.

त्यांना पंचवीस हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.त्यांनी कालिका मातेचा सुंदर देखावा साकारला होता. सोबत शिव रूपातील गणेश मूर्ती आणि खाली शिव शंकराची पिंडी विराजमान करण्यात आली होती. त्यामुळे देखाव्याची शोभा आणखीन वाढली होती.तर प्रणाली म्हात्रे हिने हस्तकलेच्या माध्यमातून सर्वांना आकर्षित करणारी देखाव्याची कलाकृती साकारली होती. त्यांना द्वितीय क्रमांकाचे १५ हजाराचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले.

तर चिरनेर येथील करण कमळाकर पाटील यांना तृतीय क्रमांकाचे दहा हजाराचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. त्यांनी कैलास पर्वताचा देखावा अगदी हुबेहूब साकारला होता. देखाव्यात शिवरूपी गणरायाची मूर्ती सोबत बाल गणेशाची मूर्ती भक्तांना भुरळ घालीत होती. विजेत्यांना माजी सरपंच कैलास डाकी, तेजस डाकी व त्यांच्या मातोश्रींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.



# तळा प्रेस क्लब तर्फे शिक्षक दिन व साक्षरता दिन साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

माजी राष्ट्रपती कै.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५सप्टेंबर जन्म दिन हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो व ८सप्टेंबर जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जातो. ५ सप्टेंबर रोजी गौरी गणपती सणाची सुट्टी असल्याने शिक्षक दिन साजरा करता आला नाही आज ८ सप्टेंबर सा-क्षरता दिन संयुक्तपणे तळा पत्रकार संघटना (रायगड प्रेस क्लब) तर्फे आयोजित करण्यात आला.



शिक्षक हे विद्यार्थ्यांना घडवीत असतात. विद्यार्थी देशाचे सुजाण नागरिक व भावी पिढी आदर्शवंत घडावी देशाचे भवितव्य त्याच्यात हातात असून उत्तम शिक्षण देत असतात. अशा शिक्षकांना सन्मान करणे हे आपली सामाजिक बांधिलकी व कर्तव्य समजून साजरा करण्यात आला. तसेच ८ सप्टेंबर जागतिक साक्षरता दिन युनेस्को परिषदेत ठराव संमत झाला. देशात१९६७सालापासून अमंलात आला निरक्षर राहू नये हा उद्देश आहे म्हणून साक्षरता दिन साजरा केला

यावेळी प्रेस क्लबचे उपाध्यक्ष किशोर पितळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले कि देश घडविण्यात शिक्षकांचे मोठे योगदान असते गुरू जनांचा आदर ठेवला पाहिजे आपण देशाचे सुजाण नागरिक आहात गुरुनी दिलेल्या ज्ञानाची शिदोरी घेऊन भावी शिक्षण घ्यावे. गुरू ना शाळेला कधी विसरू नका. यावेळी माजी मुख्यमंत्री बॅ.अंतुले व केंद्रीय अर्थमंत्री मंत्री सी डी देशमुख या महनीय व्यक्ती चा आदर्श समोर ठेवला. यावेळी सुनील बैकर सर यांनी शाळेसाठी विद्यार्थी शिष्यवृत्ती, मंथन परिक्षा, नवोदय विद्यालय प्रवेश-परीक्षा स्पर्धापरीक्षा अशा विविध परीक्षा मार्गदर्शन करून जवळ पास पन्नास विद्यार्थी उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षण घेत आहेत त्यांनी दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल विषेश सन्मान करण्यात आला. शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन व मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर मितल वावेकर निकम सर माडी मॅडम, गुरव, भोईर सह शिक्षकांना गौरविण्यात आले. यावेळी नजीर पठाण आंबेगावेसर पत्रकार खंडागळे सर उपस्थित होते.

# महाडमध्ये कोकण क्षत्रिय मराठा क्रेडिट सोसायटी शाखेचे उद्‌घाटन

**दै.रायगड नगरी । महाड**

कोकण क्षेत्रीय मराठा को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या महाड शाखेचा भव्य उद्धाटन सोहळ्यात फलोत्पादन रोजगार हमी योजना मंत्री भरत शेठ गोगावले यांनी कोकणातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांना शेती सोबत जोडधंद्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी फल प्रक्रिया केंद्र उभारले जाणार असून नवरात्र उत्सवाच्या गोळ्या तातडीची बैठक घेण्यात येईल अशी ही घोषणा केली.

मुंबई बँकेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र सहकार क्षेत्राचे अध्यक्ष आमदार प्रवीण भाऊ दरेकर यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले तरुणांना सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी व्हावा कोकणातील तरुणांनी शिक्षणानंतर मुंबई पुण्याकडे न जाता आपल्या मातीत राहून उद्योग करावा नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे वा असा उपदेश त्यांनी दिला. त्यांनी कोकणात डेअरी मच्छीमार आणि फल प्रक्रिया केंद्र उभारण्याची गरज आहे. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून अर्थव्यवस्था मजबूत करावी असाही निर्धार त्यांनी व्यक्त केला. किशोर भाई धारिया यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले की दोन महिन्यांमध्ये सहकार क्षेत्राचा मेळावा आयोजित करून दिग्विजय लोकांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे सांगितले. बारा हजार कोटी पासून १६००० कोटीचा मुंबई बँकेने टप्पा गाठला त्याच्या सर्व श्री प्रवीण भाऊ दरेकर यांना देण्यात येते. सन १९३६ मध्ये स्थापन झालेली मध्ये कोकण क्षत्रिय मराठा को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड महाड प्रभात कॉलनी मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बुधवार उद्धाटन सोहळा पार पाडला. तब्बल पहिल्या दिवशी तर एक कोटीहून आधी ठेवी जमा झाले असल्याचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र वेरूळकर यांनी संस्थेच्या ९० वर्षाचा आढावा मांडला भविष्यात आणखीन शाखा उघडण्यात येतील असे सांगितले. या सोहळ्याला मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, शेतकरी शिवसेना संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष विजय सावंत, भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश परिषदेचे सदस्य बिपिन दादा महामुनकर, डॉक्टर चेतन सुर्वे, बाळ राऊळ, वरिष्ठ डेअरी चे चेअरमन प्रशांत यादव, माजी नगरसेवक प्रकाश दरेकर, अमित मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

### चिमुकल्यांच्या शिक्षणाचा श्री गणेशा भाड्याच्या खोलीतून

# रायगड मधील ७०० अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारतीच नाहीत ; इमारतीसाठी प्रस्ताव

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील ६९७ अंगणवाडी केंद्रांना अद्यापही स्वतःची इमारत नाही.रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागामार्फत जिल्हा नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठवले आहेत. त्या पैकी जे प्रस्ताव मंजूर होतील तेवढ्या अंगणवाडी ह्यांना स्वतंत्र जागा मिळणार आहेत.

सद्यस्थितीत ज्या भाड्याच्या जागेत आहेत त्यांना ग्रामपंचायत इमारत, समाजमंदिर किंवा अन्य ठिकाणी बसून शिक्षणाचे धडे गिरवावे लागत आहेत. यामुळे चिमुकल्यांच्या शिक्षण आणि पोषणाला बाधा निर्माण होत असून, स्वतंत्र अंगणवाड्या झाल्यास चिमुरड्यांना ज्ञानार्जन घेणे अधिक सुलभ आणि सोयीचे होईल. रायगड जिल्ह्यात ३ हजार १५१ अंगणवाडी केंद्रे आहेत. यापैकी २ हजार ४५४ अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत असल्याने या ठिकाणी भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, उर्वरित ठिकाणी स्वतंत्र इमारत उपलब्ध नाहीत. परिणामी, या ठिकाणच्या चिमुकल्यांना जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत इमारत, आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी सेविकेचे घर आदी ठिकाणी बसून शिक्षण घ्यावे लागत आहे. यामुळे चिमुकल्यांना दर्जेदार आणि मोकळ्या वातावरणात शिक्षण कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



एकूण अंगणवाड्यापैकी जवळपास २४५४ अंगणवाड्यांना हक्काची इमारत आहे. या ठिकाणी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत. अंगणवाडी सेविका चिमुरड्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रामाणिकपणे सेवा बजावतात. ज्या अंगणवाड्यांना स्वतःची इमारत नाही त्या जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत इमारत, आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी सेविकेचे घर आदी ठिकाणी बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.

ज्या अंगणवाड्या भाड्याच्या जागेत आहेत तिथे पोषण आहार शिजवतानाद- ेखील अडचणीचा सामना करावा लागतो. यामुळे अंगणवाड्यांना हक्काची जागा मिळणे गरजेचे आहे.तसेच जागेची समस्या असल्याने चिमुरड्यांना खेळ खेळताना जागेची समस्या उद्भवते. लोकवस्तीत अंगणवाड्या कार्यरत असल्याने व जागा उपलब्ध नसल्याने मुलांना खेळवायचे कसे, असा प्रश्न निर्माण होतो. लहान मुलांना मोकळ्या आणि हवेशिर वाता- वरणात शिक्षण देणे गरजेचे आहे. मात्र अनेक अंगणवाड्यांना हक्काची जागा नसल्यामुळे अपुऱ्या व सोयी-सुविधांचा अभाव असलेल्या ठिकाणी अंगणवाड्या चालविण्यात येतात.

> ज्या अंगणवाड्या ना स्वतंत्र जागा अथवा इमारत नाही त्यांचे प्रस्ताव जिल्हा नियोजन मध्ये पाठवण्यात आले आहेत. तिकडून मंजूर आले कि उर्वरित अंगणवाडी ह्यांना टप्प्या टप्प्याने स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली जाईल.
>
> **निर्मला कुचिक**
> **महिला बाल विकास**
> **अधिकारी रायगड जिल्हा परिषद**

## बेलवडे हद्दीतील जलबोगद्यामुळे शेतीसह घरांचे नुकसान ; मेघा कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्याच्या हेटवणे धरणातून नवी मुंबईला सिडकोद्वारे जाणा-या पाण्यासाठी बेलवडे आणि जिते या ठिकाणी ३०० फुट जलबोगद्याची निर्मिती केली आहे.मात्र बेलवडे हद्दीतील खोदण्यात आलेल्या जलबोगद्यामुळे येथील अनेक शेतीचे तसेच घरांचे नुकसान झाले असून सदर काम करणाऱ्या मेघा इंजिनीयर कंपनीने येथील शेतकऱ्यांना फसविले असल्याचे सांगण्यात आले आहे. एकीकडे पेणच्या वाशी खारेपाट विभागातील जनता पिण्याच्या पाण्यासाठी व्याकुळ असताना मात्र नवी मुंबईच्या जनतेसाठी सिडकोद्वारे हेटवणे धरणाचे पाणी जलद गतीने तिकडे जाण्यासाठी बेलवडे ते जिते अशा दोन ठिकाणी ३०० फूट जलबोगदा खोदण्यात तसेच ब्लास्टिंग होत असताना यादरम्यान बेलवडे हद्दीतील अनेक शेतकऱ्यांचे तसेच घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन अनेक घरांना तडे गेले आहेत. या जलबोगद्याचे काम मेघा इंजिनियर कंपनीने घेतले असून सुरुवातीला येथील कंपनीने नुकसान होत असलेल्या शेतकऱ्यांना तसेच घरांना नुकसान भरपाई देण्याचे ठरविले होते तसेच रस्त्यातून होणा-या अवजड वाहतूकीमुळे येथील रस्ताची सुद्धा दुरुस्ती करण्यात येईल अशा आश्वासन दिले होते परंतु कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याने शेतकऱ्यांनी आता उठाव केला आहे. त्यामुळे हेटवणे धरणाचे पाणी प्रथम पेणकरांना मिळत नसल्याने हा संघर्ष पेटणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.तर बेलवडे येथे ३०० फूट खोदण्यात आलेल्या जलबोगद्यासाठी ब्लास्टिंग झाली नसून याचा धरणाला कोणताही धोका नाही अशी चुकीची आणि खोटी माहिती देणा-या तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक नरेश पवार यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संदीप रेणुका पाटील यांनी केली आहे.

## मुरुड शहराला शुद्ध पाणी पुरवठा करण्यात यावा : संजय गुंजाळ

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या महिनाभरापासून मुरुड शहराला गढूळ अशुद्ध पाणी पुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन नगरपरिषदेला शुद्ध पाणी पुरवठा करण्यात निर्देश देण्यात यावेत.याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष तथा कोकण मराठी साहित्य परिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री ना.आदिती तटकरे यांना एक निवेदन देण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन खासदार सुनिल तटकरे यांच्या सहकार्यातून मुरुड शहराला अतिशय चांगली पाणीपुरवठा व्यवस्था मिळाली होती. परंतु सद्यस्थितीत नगरपालिकेचे पाणीपुरवठा व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले असल्याने व फिल्टर प्लांट मेंटेनन्स/ दुरुस्ती वेळेवर व्यवस्थीत होत नसल्याने मुरुड शहराला एक महिनाभर दुषीत पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे मुरुड शहरात रोगराई पसरलेली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तरी याबाबत आपणाकडून जिल्हाधिकारी-रायगड, मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना तशा प्रकारचे निर्देश देण्यात यावेत. अशी विनंती संजय गुंजाळ यांनी देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सोशल मीडिया उपाध्यक्ष हसमुख जैन, तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, राष्ट्रवादी जिल्हा चिटणीस विश्वास चव्हाण, नरेंद्र हेदुलकर मान्यवर उपस्थित होते.

## शॉक लागल्याने बैलाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महावितरणच्या तुटलेल्या केबलचा शॉक लागल्याने आंबिवली येथील शेतकऱ्याच्या बैलाचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली जात आहे.

बाळाराम शंकर पाटील हे आंबिवली येथे राहत असून त्यांच्या शेतीच्या परिसरात एका विद्युत खांबावरील केबल तुटली होती. त्यांनी याबाबत महावितरणच्या वायरमेनला चार ते पाच दिवसांपूर्वी कळवले होते. मात्र कोणीही त्या ठिकाणी काम करण्यात आले नसल्याचा आरोप पाटील यांनी केला. त्या तुटलेल्या केबलचा बैलाला स्पर्श झाल्याने यात बैलाचा मृत्यू झाला. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. केबल तुटलेली असल्याने मनुष्यहानी देखील होऊ शकते. वायरमेनच्या बेपरवाईमुळे ही घटना घडली असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे नुकसान भरपाई मिळावी आणि वायरमेनवर कारवाई व्हावी अशी मागणी पाटील यांच्याकडून केली जात आहे.

**गाळा विकणे आहे**

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**

### वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## कर्जत रेल्वे पोलिसांची चांगली कामगिरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत लोहमार्ग पोलीस ठाणे चे पोलीस शिपाई गोरख मासाळ व महिला पोलीस शिपाई पूजा मने हे दि. ७ सप्टेंबर २५ रोजी दिवसपाळी कर्तव्यावर असताना दुपारी १ वाजेच्या सुमारास च्या सुमारास नेरळ स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले पोलीस शिपाई श्रीकांत जाधव यांनी नेरळ स्टेशन येथून फोन द्वारे कळवले की, कर्जत वरून दुपारी १ वा. चीछत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ला जाणारी लोकल गाडीच्या बाजूकडून प्रथम वर्गाच्या डब्याच्या बाजूचा जनरल डब्यामध्ये एक बॅग राहिली आहे.

तरी तुम्ही ती गाडी चेक करा असे सांगितल्या वरून कर्तव्यावर असलेल्या मासाळ आणि मने यांनी लोकल डब्बा चेक केला असता नमुद वर्णनाची बॅग मिळून आली. बॅग चेक केली असता सदर बॅग मध्ये १ लॅपटॉप, कीबोर्ड, माउस, स्मार्ट वॉच , व इतर साहित्य व कागदपत्रे असे एकूण ९०,०००/- ( नव्वद हजार) किं. च्या वस्तु मिळून आल्या.

### इमारत पुनर्विकास निविदा सूचना
### श्रीयश सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकासयोजना

प्रस्तावित सहकारी संस्था ७९ (अ) इमारत पुनर्विकास योजने अंतर्गत अनुभवी, तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम, योग्य व पात्र विकासकांकडून जुनी धोकादायक इमारत पाडून पनवेल महानगरपालिकेचे व युडीसीपीआर -२०२० च्या नियमांना अधीन राहून नवीन इमारत पुर्नबांधणीसंबंधी निविदा मागविणेत येत आहेत. व सदर पुनर्विकसनाकरिता विकासकाला गर्दी व सततच्या रहदारी, वाहतूक असलेल्या ठिकाणी बांधकाम करण्याचे तसेच वाहतूक व्यवस्थापन करण्याचे कौशल्य असले पाहीजे. तसेच विकासकाला लगतच्या भूखंडांचे एकत्रिकरण करुन बांधकाम करण्याचे अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच सर्व बांधकाम पुर्णत्वाचे दाखले व इतर आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) संस्थेचे नाव : श्रीयश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल,
२) संस्थेचा पत्ता : नगर भूमापन क्र. ४६१/अ व ४६२, टिळक रोड मौजे-पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.
३) संस्था नोंदणी क्र. : (PGD/PWL/HSG/TC/1128-1998-99) दि. ३०/०७/१९९८
४) भुखंडाचे वर्णन : नगर भूमापन क्र. ४६१/अ चे क्षेत्र ८५६.२ चौ. मी. व ४६२ चे क्षेत्र १२७.९ चौ. मी., मौजे पनवेल दोन्ही रहीवासी भुखंड मिळकतींचे एकुण क्षेत्र ९८४.१० चौ. मी.
५) अस्तित्वात असलेल्या इमारतीतील सदनिका/गाळयांची संख्या : ३१ सदनिका, दुकाने व ९ ऑफिसेस असे एकूण ४० युनिटस्
६) जुनी इमारत पूर्णत्वाचा दाखला व दिनांक: BP-5/८५८ दिनांक २९/०९/१९९७ (आर्कि, अरुण भगत)
जुनी इमारत भोगवटा दाखला व दिनांक: BP-5/६७५ दिनांक १९/०५/१९९८ (आर्कि, अरुण भगत)
७) निविदा उपलब्धता व विकी : सदर संस्थेच्या पुनर्विकसनाबाबतच्या कोऱ्या निविदा दि. ०९/०९/२०२५ ते १९/०९/२०२५चे दरम्यान (सुटीचे दिवस सोडून) पी.एम.सी. यांचेकडे सकाळी ११:०० ते सायंकाळी ७:०० दरम्यान व संस्था यांचेकडे सायंकाळी ५:०० ते सायंकाळी ८:०० दरम्यान खालील पत्यावर मिळू शकतील.
८) निविदा कागदपत्रांचे मुल्य : विनापरतावा रुपये २०,०००/- (अक्षरी वीस हजार मात्र) डी.डी. किंवा पे ऑर्डर स्वरुपात जमा करणे.
९) प्रीबीड मिटींग : २०/०९/२०२५ रोजी मंगळवारी सायंकाळी ६:०० वाजता पी.एम.सी. कार्यालय येथे
१०) निविदा स्विकारणेचे ठिकाण व शेवटचा दिनांक : दि. २२/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५ चे दरम्यान (सुटीचे दिवस सोडून खालील वेळेनुसार) पी.एम.सी. यांचेकडे सकाळी ११:०० ते सायंकाळी ७:०० दरम्यान व संस्था यांचेकडे सायंकाळी ४:०० ते ७:०० वाजेपर्यंत मो.क्र. (८६५५०३३६३५/९७६९४१२२८५/९२२४८८२६११)
११) पी.एम.सी. कार्यालय : ॲड. व नोटरी श्री.सचिन मा.कल्याणकर ॲण्ड असो.,(पी.एम.सी.), पहिला मजला, प्लॉट क्र. १५६४, स्नेह रोहित स. गृह. सं. मर्या. नवरंग फॅशनच्यावर, नाट्यगृहाच्या समोर, शिवाजी पुतळा सर्कलजवळ, पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ मो. क्र. (९८७०९८६१३५/९७६८३६६७१४/८१६९९६९१७५)
१२) निवीदा खोलणे : सायंकाळी ७:३० वाजता दि. ०२/१०/२०२५ रोजी ज्या निवीदा धारकांचे ई.एम.डी. व टेक्निकल बीड पात्र व वैध असतील त्यांचेच मुख्य ऑफरचे प्राइज बीड उघडण्यात येईल. (काही बदल असल्यास कळविण्यात येईल)

टिप : कोणत्याही कारणाशिवाय निविदा स्विकारणेचा/नाकारणेचा अथवा रद्द करण्याचा स्वाधिकार हा संस्थेच्या कार्यकारी व इमारत पुनर्विकास समितीस असेल.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०८/०९/२०२५

सही/-
**श्रीयश सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकास योजना**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण, जि.रायगड**
दूरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६
Email id - tahasilpen@gmail.com

महसूल शाखा- क्र. फौजदारी/कात-४/जन्म/मृत्यू आदेश/२०२५
दिनांक :- ०८/०७/२०२५

### जाहीर नोटीस
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे न्यायालयात**

श्री. राम उर्फ रामा लक्ष्मण वाघमारे,
रा.करंबेली, ता. पेण जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वाशिवली, ता.पेण, जि.रायगड. — सामनेवाला

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई मैनी लक्ष्मण वाघमारे यांचा मृत्यु दिनांक ०२/०९/१९९४ रोजी राहत्या घरी मौजे करंबेलीवाडी, पो. वरसई, ता. पेण, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत वाशिवली, ता. पेण जि. रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारीत तरतुदीनुसार त्यांच्या मृत्युची नोंद घेण्याचेआदेश पारीत होण्याकामी अर्जदार यांनी दि.०५/१२/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार याच्या जन्माची नोंद कार्यालयीन अभिलेखी घेण्यास व त्यासंबंधीचे नियमोचित आदेश पारीत करण्यास कोणत्याही स्वरुपाच्या हरकती असल्यास ती या जाहीर नोटीशीच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात व समूचित कागदपत्र/पुराव्यासह या न्यायालयात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास अर्जदार यांच्या अर्जानूसार व विनंतीनुसार अर्जदार यांच्या आई मैनी लक्ष्मण वाघमारे यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत वाशिवली या कार्यालयाच्या अभिलेखी घेण्याबाबत योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी पेण**

### PUBLIC NOTICE

PUBLIC NOTICE is hereby given that my client intends to purchase Land bearing Survey No.102/3/A, admeasuring area 0-33-40, potkharaba 0.06.10 H.R.P. total area 0-39-50 Situated in Village Kalambusare, Taluka Uran, District Raigad (more particularly described in Schedule mentioned here-under) from Radha Jeevan Jadhav, Ganesh Jeevan Jadhav, Jayshree Krishna Gaikwad, Rajashree Santosh Pawar, Sagar Jeevan Jadhav, Madhuri Ramesh Kadam, Prashant Rahul Gaikwad, Priyanka Rahul Gaikwad, Nilesh Rahul Gaikwad.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Survey No.102/3/A, admeasuring area 0.33.40 H.A.R. Pothkharaba area 0.06.10 H.A.R. total admeasuring area 0.39.50 H.A.R situated at Village Kalambusare, Taluka Uran, District Raigad.

Any person/s, Legal Heirs, firm, company having any claims in, to or over the said Land or any part thereof, either by way of sale, mortgage, lien, gift or otherwise howsoever, should give Notice of such Claim/Objection in writing stating therein the nature of his/her/their Claim/Objection alongwith other particulars sufficient to identify the same as well as documentary evidence, in support thereof and the same must be lodged with the office of the undersigned within 15 days from date of Publication of this Notice failing which it shall be presumed that the said Land to be purchased is free from all encumbrances and the rights and claims or any holder of the claim, if any has been waived and my client shall proceed with the purchase of the said Land without considering any Claim or Objection received after expiry of Notice period as aforesaid.

Sd/-
**ANKIT SHARMA**
**ADVOCATE**
**Office No.81, Gautam Complex, Sector -11, C.B.D. Belapur Navi Mumbai, District Thane, Maharashtra, India - 400614.**
**Con.no.+91-9022307027**

### जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे चिरनेर, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री विलास हिराजी ठाकूर व इतर यांच्या मालकीची आहे.

| मौजे | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| चिरनेर | २५०/१३/ब | ०-०९-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-०९-०० | ०.३१ |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा /लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दि.०८/०९/२०२५

सही/-
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट**
**९. दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी उरण, ता. उरण.**
**फोन नं. ८८७९१४१२३२**

### जाहीर नोटीस

माइया अशिलाच्या वतीने सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे सुचित करण्यात येते की, सिडकोने ॲग्रीमेन्ट टू लीजचे दस्ताद्वारे श्रीमती रिना सुखदेव घोडसे व इतर १ यांस खाली वर्णनीत भुखंड हस्तांतरीत केलेला आहे. सिडको व श्रीमती रिना सुखदेव घोडसे व श्री. विजय सुकदेव घोडसे, यांचेमध्ये दिनांक १०/०७/२०२५ रोजी ॲग्रीमेन्ट टू लीज चा दस्त साक्षांकीत झालेला असून तो मा. सह दुय्यम निबंधक पनवेल क्र.४ यांचे कार्यालयात दिनांक १०/०७/२०२५ रोजी अनुक्रमांक १२८१८/२०२५ कडे नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. माझे अशिल मेसर्स युनाईटेड बिल्डर्स तर्फे भागीदार १) राहूल राजेंद्र चव्हाण, २) अहिल्या अमृत थिटे, ३) अपसरमिया महताब कारभारी यांनी श्रीमती रिना सुखदेव घोडसे व इतर १ यांच्या मालकीचा सिडकोच्या साडेबावीस टक्के पुनर्वसन व पुनःस्थापना योजनेअंतर्गत खालील वर्णनीत एकूण भुखंड क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र म्हणजेच २५ चौ.मी. क्षेत्राचे सर्व हक्क अधिकार व फायदा कायमस्वरुपी, ट्रायपार्टाईट ॲग्रीमेन्ट / त्रिपक्षीय भाडेपट्टा हक्क हस्तांतरण करारनाम्याद्वारे हस्तांतरीत / खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. याकरीता ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली आहे. त्या भूखंडात्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड/गाव | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| मौजे पुष्पकनगर (वहाळ), पुष्पक नोड, ता.पनवेल, जि.रायगड | १४५ जी | २६ | एकूण क्षेत्र ५० चौ.मी.पैकी २५ चौ.मी. |

उपरोक्त भूखंड/मिळकतींबाबत अन्य व्यक्ति/व्यक्तिंचे/कंपनी/ संस्था/एलएलपी/सोसायटी असोसिएशन किंवा आर्थिक संस्थांचे भुखंडासंदर्भात हक्क, दावा, कोणाचा कसलाही हक्क, जबाबदारी, वारस हितसंबंध, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, वश्विस, भेट, भाडेपट्टा, लोन, बुकिंग, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, भूखंड विक्रीचा करार, खरेदीखत, मेन्टेनन्स् मेहेर, हक्कसोड, विकी, विश्वस्त, कुळ, वहीवाट, दावा, तकार, अटैचमेंट, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर त्यासंबंधी लेखी निवेदन अथवा हरकत कागदोपत्री पुराव्यासह द्यावी, याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे अशील सदर विकी व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व सदर भूखंडामध्ये कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हित संबंध नाही असे समजून माहो अशिल हे सिडको व वर नमूद भाडेपट्टाधारक यांचेसोबत ट्रायपार्टाइट ॲग्रीमेन्ट करुन सदर भूखंड हस्तांतरीत करून घेतील, त्यानंतर सदर मिळकतीचा संपूर्ण उपभोग घेण्याचा आमचे अशिलांना अधिकार राहील व तसे त्यांना सदर मिळकतीचे टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट ॲण्ड सर्च रिपोर्टही देण्यात येईल व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखलाही दिला जाईल. मुदतीनंतर आलेली हरकत ग्राहय धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

दि.०९/०९/२०२५

सही/-
**ॲड. प्राचाली श्रीरंग पाटील**
**सदनिका क. २०१, भद्रकत को ऑप. हौ. सो.लि., ए.टी.आय. समोर, व्ही. एन. पुरव रोड, चुनाभट्टी, सायन, मुंबई -२२**
**मो. नं. ७२०८३३२३१८**

# स्वकष्टाने मेहनत करून ज्येष्ठता मिळवा : लोकनेते रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वकष्टाने मेहनत करून, समाजाचे काम करा, गोरगरीब जनतेला समजून घेऊन त्यांना मदत करा, आपल्या वयाने नाहीतर कार्याने आपली ज्येष्ठता सिद्ध करा, असे आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वावर्ले येथे रक्तदान शिबिरावेळी केले. दानशूर व्यक्तिमत्व, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रक्तदान शिबिर उपक्रम राबविण्यात येत आहे.



या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चा खालापूर मंडळाच्या वतीने रविवारी खालापूर तालुक्यातील वावर्ले येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याशिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या शिबिरावेळी आमदार महेश बालदी म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमिताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्त तुटवडा भरून काढण्यासाठी एक विशेष रक्तदान शिबिरा बरोबर रोजगार मेळावा, महा रोजगार मेळावा, तसेच आदिवासी मुलांना शाळेत जाण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध करून दिली असून आणखी एक बस उपलब्ध होणार असल्याचे सांगितले तर या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे.हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थैलेसिमियाग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. आतापर्यंत पनवेल, खारघर आणि खांदा कॉलनी येथे हे शिबिर यशस्वी आयोजन करण्यात आल्याचे भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी सांगितले. वावर्ले येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसादात लाभला. एम जी एम हॉस्पिटल कामोठे व सखा फाऊंडेशन मेडिकल पनवेल यांच्या सहयोगाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

### पाली नगरपंचायत निवडणुकीत राजकीय भूकंप

# राष्ट्रवादीचा धक्कादायक निर्णय ; नलिनी म्हात्रे माघार घेऊन भाजपच्या पराग मेहता यांना पाठींबा!

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

पाली नगरपंचायत नागराध्यक्ष पदासाठी सुरु असलेली तिरंगी लढत अनपेक्षित वळ-णावर येऊन ठेपली आहे. अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी (दि. ८ सप्टेंबर) राष्ट्रवादी काँग्रेसच्या नलिनी म्हात्रे यांनी उमेदवारी मागे घेत भाजपचे उमेदवार पराग मेहता यांना पाठींबा जाहीर केला. या निर्णयामुळे निवडणुकीचे संपूर्ण चित्र पालटले असून शिवसेनेच्या कल्याणी संदीप दपके यांची दावेदारी अक्षरशः कोसळल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रवादीच्या तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना स्पष्ट केले की, पाली नगरपंचायतच्या हितासाठी तसेच स्थैर्यपूर्ण विकासाकरिता भाजप उमेदवार पराग मेहता यांना आमचा ठाम पाठिंबा आहे. हा निर्णय पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला आहे.

सुरुवातीपासूनच शिवसेना उमेदवार कल्याणी दपके यांचे बळ प्रबळ मानले जात होते. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेसच्या माघारीमुळे त्यांचे गणित पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी व भाजप यांच्या अंतर्गत चर्चांनंतर हा धक्कादायक निर्णय घेण्यात आला असल्याचे समजते. त्यामुळे दपके यांच्या प्रचारातील उत्साह एकदम ओसरल्याचे दिसत आहे.या संपूर्ण घडामोडीमागे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते खासदार सुनील तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांची राजकीय कूटनीती असल्याची चर्चा रंगली आहे. पाली नगरपंचायतीत सत्ता हस्तगत करण्यासाठी त्यांनी भाजपसोबत सूत्रे आखली असून पराग मेहता यांना विजयी करण्याचा निर्धार केला आहे.नलिनी म्हात्रे यांनी अर्ज मागे घेण्याच्या वेळी नगरसेवक सुधीर भालेराव, नगरसेवक सुलतान बेन्सेकर, अमीर वारंडे व ग. रा. म्हात्रे , ललित ठोंबरे , सुशील शिंदे हे उपस्थित होते. त्यावेळी भाजप कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. पालीत आता नगराध्यक्षपद भाजपच्या झोळीत जाणार हे निश्चित आहे, असे भाजप नेत्यांनी ठामपणे सांगितले. पाली नगरपंचायत निवडणुकीत हा निर्णय अक्षरशः 'गेम चेंजर' ठरला आहे.

# घोडा मधोमध आल्याने एका तरुणाचा गंभीर अपघात

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात मोकाट घोडे व गुरांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दोन दिवसांपूर्वी श्रीवर्धन भट्टीचा माळ बस थांब्याजवळ एका तरुणाचा गंभीर अपघात झाला आहे.

श्रीवर्धन हरिहरेश्वर मार्गावर तसेच श्रीवर्धन दांडगुरी मार्गे बोरली मार्गावरती म्हाबदे घाट परिसरामध्ये अनेक घोडे रस्त्यावरती मुक्त संचार करताना आढळून येतात. काही दिवसांपूर्वी एका पर्यटकांच्या वाहनाने एका घोड्याला धडक दिली. त्या पर्यटकाकडून घोडे मालकांनी पैसे वसूल केले. परंतु आता एक तरुण गंभीर जखमी झाल्यामुळे त्याला पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात हलवावे लागले आहे.

सदर अपघातामध्ये घोडा देखील मृत झाल्याचे सांगण्यात येते. परंतु या घोड्याचा मालक कोण? याबाबत अद्याप कोणीही पुढे आलेले नाही. अपघाताच्या ठिकाणाहून घोडा रातोरात गायब करण्यात आला. त्यामुळे देखील नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# महापालिका कार्यक्षेत्रात हत्तीरोग रुग्णशोध मोहिम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हत्तीरोग दूरीकरण संबधीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यासाठी हत्तीरोग समस्या असलेल्या व नसलेल्या सर्वच जिल्ह्यामध्ये हत्तीरोग रुग्णशोध मोहिम राबविण्याबाबत शासनाच्या सूचना आल्या आहेत. त्यानूसार आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोहिम राबविण्यात येत आहे. हत्तीरोग रूग्णशोध मोहिमेंतर्गत महापालिकेच्यावतीने ब्लॉक्सनूसार रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षण करण्यात येत आहे.या अनुंषगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत अतिजोखमीची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून,येथील रात्र रक्त नमुने संकलन करण्यात येत आहेत. या अतिजोखीमीच्या भागांमधून हत्तीपाय रुग्णांची सर्वाधिक संख्या असलेले भाग निवडण्यात आले आहेत. तसेच झोपडपट्ट्यांचे प्रभाग, मोठ्या स्थलांतरित लोकसंख्येच्या वसाहती असलेली अशा क्षेत्राची देखील निवड करण्यात आल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिली आहे. सदर मोहीमेंतर्गत हत्तीरोग रुग्ण शोधणे व कार्यक्षेत्रात संशयित रुग्णांचे रक्त नमुने गोळा करण्याचे काम व गोळा झालेल्या रक्त नमुन्यांची तपासणी करण्याचे काम महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत दिवसा हत्तीरोग रुग्ण शोधणे व रात्र रक्त नमुने संकलन एम एफ सर्वेक्षण बहुउद्देशीय कर्मचारी पुरुष व आरोग्य सेवकांकडून टीमद्वारे करण्यात येत आहे.



# पत्रकार मारहाणीच्या निषेधार्थ पोलीस अधिक्षकांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पेण**

पत्रकार विकास मिरगणे यास पार्किंग च्या वादातून मारहाण करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षकावर कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना सर्व पत्रकार वतीने नुकतेच निवेदन देण्यात आले.



साम टीव्हीचे पत्रकार व रायगड प्रेस क्लबचे सदस्य विकास मिरगणे हे मुंबई गिरगाव येथे गणेश विसर्जन प्रसंगी वार्तांकण् करण्याचे वेळी गाडी पार्किंग करताना तेथे ड्युटीवर असणारे सहाय्यक निरीक्षक शांताराम नाईक यांच्याशी शुल्लक कारणावरून बाचाबाची झाली, यातून पोलीस निरीक्षक शांताराम नाईक याने पत्रकार विकास मिरगणे यांच्या कानाखाली लगावली.

या मारहाणीच्या निषेधार्थ अशा व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षक शांताराम नाईक यांचे वर कारवाई करावी यासाठी रायगड जिल्हा प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्याध्यक्ष संजय मोहिते, उपाध्यक्ष मोहन जाधव, पत्रकार हल्ला कृती समितीचे जिल्हा संघटक विजय मोकल, माजी अध्यक्ष भारत रांजणकर, जिल्हा प्रेस क्लबचे संघटक कमलेश ठाकूर,अमोल जैन,गणेश पवार,राजेश भोस्तेकर, ज्ञानेश्वर बागडे व इतर पत्रकार उपस्थित होते.त्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशा दिलेल्या निवेदनात जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे संबंधित निवेदन पाठवणार असल्याचे सांगितले.

# कामोठ्यातील खून प्रकरणाचा शेवट; ६ वर्षानंतर फरार आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे येथील जुई गावात ६ वर्षांपूर्वी एकाने आपल्या पत्नीला रॉकेलमध्ये पेटवले होते. पाच दिवसांनी उपचारादरम्यान या महिलेचा मृत्यू झाल्यापासून कामोठे पोलीस संशयीत पतीचा शोध घेत होते. मात्र पोलिसांच्या विविध पथकाने शोध घेऊनही माथेफीरू पती सापडत नव्हता. अखेर कामोठे पोलिसांच्या अथक प्रयत्नानंतर पत्नीचा खून करून फरार असलेल्या आरोपी पतीला हैद्राबाद येथून अटक केली.

जुई गावातील एका भाड्याच्या घरात मनोहर सरोदे आणि त्याची पत्नी आणि मुले असे कुटूंबिय राहत होते. ४ डिसेंबर २०१९ रोजी मनोहरने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिला रॉकेल ओतून पेटवून टाकले. या घटनेनंतर मनोहर पळून गेला. तर मुलांची वाताहत झाली. दोन मुलांना अनाथ आश्रमात आश्रय घ्यावा लागला. पोलिसांच्या वेगवेगळ्या पथकाने या घटनेनंतर मनोहरच्या गावापर्यंत शोध घेतला. परंतू घटना घडल्यावर मनोहर एकदा त्याच्या मूळ गावी नांदेड येथे गेला आणि त्याचे वडिल त्याला पोलिसांत घेऊन जात असल्याचे समजल्यावर तो तेथून पळाला. त्यानंतर तो गावी कधीच परतला नाही.

पोलिसांनी अनेकदा शोध घेऊनही मनोहर सापडत नसल्याने हे प्रकरण २०२३ मध्ये बंद करण्यात आले. परंतू नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सध्या नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिका-यांना ज्या प्रकरणातील आरोपी अनेक वर्षे फरार आहेत यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानूसार पोलीस उपायुक्त प्रशांत मोहीते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांच्या नेतृत्वाखाली कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी जुई गावातील महिलेच्या खूना प्रकरणाची पुन्हा झाडाझडती घेण्याचे आदेश सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत तायडे यांना दिले. पोलीस अधिकारी प्रशांत तायडे यांनी हे तपास बंद प्रकरणाची फाईल पुन्हा एकदा उघडून त्या प्रकरणाचा तपास सुरू केला. फरार मनोहरच्या एका दूरच्या नातेवाईकाने पोलिसांना दिलेल्या माहितीनूसार मनोहर सध्या स्वताचे नाव बदलून हैद्राबाद येथे राहत असून तो नवीन नावाने वावरतो. तसेच त्याची नांदेड येथे राहणारी मुलगी व जावयाच्या तो संपर्कात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याच माहितीच्या आधारावर कामोठे पोलिसांनी मनोहरची मुलगी व जावयाचा मोबाईलनंबरवर फेब्रुवारी ते जून महिन्यापर्यंत पाळत ठेवली. कोणकोणत्या मोबाईल नंबरवरून या दोन मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला जातोय. याचे दोन महिने पोलिसांनी निरीक्षक केले.




जून महिन्यात मनोहरचा नंबर सापडल्यानंतर त्याच्या मोबाईलवर पाळत ठेवल्यानंतर त्याचा हैद्राबाद (तेलंगणा) येथील बगलागुंडा पोलीस ठाणे हद्दीतील जहांगिराबाद येथील पत्ता पोलिसांना सापडला. कामोठे पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी तायडे यांचे पोलीस पथक हवालदार संजय झोळ, पो-लीस नाईक सचिन ठोंबरे, पोलीस नाईक प्रविण पाटील, शिपाई प्रमोद कोकाटे यांनी या शोधमोहीमेत सखोल तपास केला. ५० वर्षीय मनोहरला अटक करून पनवेल येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्याने दारूच्या नशेत पत्नीवरील संशयामुळे तिला पेटवून दिल्याचे पोलिसांना सांगीतले. सध्या मनोहर पिंटू सींग या नावाने वावरत होता. भूशाच्या गाडीवर क्लिनरचे काम करून तो स्वतःचा उदरनिर्वाह करत होता. न्यायालयाने त्याच्याकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी पोलिसांना चार दिवसांची पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# मुंबई-गोवा महामार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्याला गतिरोधक बसविण्याची गरज

**दै.रायगड नगरी । कोलाड**

मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गांवरील गोवे, पुई, पुगांव, मुठवली, सुकेळी खिंड, या ठिकाणी अपघात हे कुठे ना? कुठे तरी घडतच आहेत.यामुळे प्रवासाच्या दृष्टीने हा महामार्ग अत्यंत धोकादायक ठरत असुन वाहन चालकांच्या वेगाची नशा दिवसेंदिवस अपघाताचे मुख्य कारण ठरत आहे यामुळे या ठिकाणी रस्त्याला गतिरोधक बसविण्याची गरज निर्माण झाली.

मुंबई-गोवा हायवेवरील गोवे व पुई नाका येथे येण्याजाण्यासाठी मार्ग बंद केला असुन गोवे येथील स्टॉप वरून कोलाड कडे जाण्यासाठी ५०० मिटर पुढे जाऊन कुंडलिका नदीच्यापुला जवळून पलीकडे जावे लागत आहे तर कोलाडकडून पुई कॉलनीकडे जातांना याच मार्गाचा उपयोग केला जातो.यामुळे भरधाव वेगात येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमुळे या मार्गांवरून प्रवास करणे धोकादायक ठरत आहे.पुई गावा जवळील स्टॉपची परिस्थिती ही अतिशय बिकट बनली असुन मुंबई-गोवा हायवे वरून गावात जाणारा रस्ता पूर्णपणे चार ते पाच फूट खाली गेल्याने पुई गावातून येणाऱ्या नागरिकांना मुंबई कडून येणारी वाहने याच दिशेला असलेला बस थांबा व रस्त्याच्या बाजूला असणारी झाडे झूडपे यांच्या मुळे लक्षात येत नाही.यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना आपला जिव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



# जिल्ह्याच्या प्रशासकीय राजवटीत शिक्षकांचा 'आदर्श' रखडला

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शिक्षक दिनाच्या निमित्ताने कर्तृत्ववान शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. परंतु, गेल्या अनेक वर्षांच्या या परंपरेला प्रशासकीय राजवटीत ब्रेक लागला आहे. तीन वर्षांपासून जिल्हा परिषदेवर प्रशासनाद्वारे कारभार सुरू आहे. प्रशासनामार्फत फक्त पुरस्कार जाहीर केले जात आहेत. मात्र, पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम घेतला जात नाही, अशी परिस्थिती आहे.

रायगड जिल्ह्यात तीन हजारांहून अधिक शाळा असून, त्यात दोन हजार ५०१ जिल्हा परिषद शाळा आहेत. या शाळांमध्ये पाच हजार ८८८ शिक्षक असून, ८७ हजार ९२ विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहे. या विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शिक्षक करतात. शासनाच्या वेगवेगळ्या शैक्षणिक व अशैक्षणिक योजनांचे काम शिक्षक करतात. डिजिटल शिक्षण देण्याबरोबरच खेळता खेळता शिक्षण यावरही अनेक शिक्षक भर देत आहेत.

आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श पुरस्कार देऊन जिल्हा परिषदेमार्फत गौरव केला जातो. या पुरस्कारामुळे शिक्षकांना एक प्रेरणा मिळते. हा पुरस्कार म्हणजे आदर्शवत शिक्षकांसाठी नवी ऊर्जा देणारे आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून पाच सप्टेंबरला दरवर्षी साजरा केला जातो.



शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केला जातो. सन्मानपत्र देऊन हा गौरव केला जातो.

या दिनानिमित्त जिल्ह्यातील आदर्शवत त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या पुरस्काराचे महत्त्व वाढले आहे. रायगड जिल्हा परिषदेमार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाची ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. परंतु, या पुरस्कार वितरणाला ब्रेक लागला आहे.

राजकीय राजवट संपून जिल्हा परिषदेवर २१ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनामार्फत जिल्हा परिषदेचा कारभार चालविला जात आहे.

तरीदेखील गेल्या तीन वर्षांपासून आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम प्रशासन राबवू शकले नाही. पाच सप्टेंबरपूर्वी आदर्श शिक्षकांची यादी जाहीर केली जाते. परंतु, त्यांचा प्रत्यक्ष सन्मान करण्यास जिल्हा परिषद प्रशासन उदासीन ठरल्याची चर्चा जोरात सुरु आहे. मागील तीन वर्षांपासून ९० हून अधिक शिक्षकांना अद्याप पुरस्कार मिळाले नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या परंपरेला ब्रेक लागल्याचे चित्र आहे.

या वर्षी ही जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. शिक्षण विभागाने हा पुरस्कार वितरण सोहळा लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी होत आहे.